**<u>वादी तर्फे साक्षीदार क्र. १</u>** **<u>नि.दि.दा.क्र. १४३/२०१९</u>**

**सुलोचना विरुध्द इंदिरा**

**मी शपथपूर्वक खरे सांगतो की** **निशाणी – ५४ पुढे**

**सरतपासणी शपथेवर सुरु वादी तर्फे वकील कुमारी आळे यांच्या मार्फत**

९. मला निशाणी ५४ कडील माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखविण्यात आले. त्यातील सर्व मजकूर माझ्या प्रत्यक्ष माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यावर मी सहया केल्या आहे.

१०. मला आता निशाणी ५६/१ कडील अर्ज दाखविला. सदरचा अर्ज मी दि. १७.०२.२०११ रोजी ग्रामपंचायत खंडाळा यांचे सचीव यांच्याकडे माझे भावाचे निधन झाल्यामुळे आमचे नाव त्याचे वारसदार म्हणून लावण्यासाठी विनंतीसाठी केला होता. सदरच्या अर्जावर माझी व वादी नं.१ च्या सहया असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर ग्रामपंचायत खंडाळा यांच्याकडील शिक्का व अर्ज मिळाल्याबाबत संबंधीत कर्मचा–याची सही आहे. ती सही व शिक्का माझ्या समक्ष केला आहे. त्यास **<u>निशाणी ५९</u>** देण्यात येते.

११. मला आता निशाणी ५६/२ कडील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये ग्रामपंचायत खंडाळा यांच्याकडे दिलेला अर्ज दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी ६०</u>** देण्यात येते.

१२. मला आता निशाणी ५६/३ कडील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये पंचायत समिती पारशिवनी यांच्याकडे दिलेला अपीलाचा अर्ज दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर पंचायत समितीच्या संबंधीत अधिका–याची अपील मिळाल्याबाबतची सही आहे. त्यास **<u>निशाणी ६१</u>** देण्यात येते.

१३. मला आता निशाणी ५६/४ कडील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये खंडविकास अधिकारी पंचायत समिती पारशिवनी यांनी मला व सचीव ग्रामपंचायत खंडाळा यांना दिलेल्या पत्राची प्रत दाखविली. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी ६२</u>** देण्यात येते.

१४. मला आता निशाणी ५६/५ कडील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये ग्रामपंचायत खंडाळा यांच्याकडे दिलेला अर्ज दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी ६३</u>** देण्यात येते.

१५. मला आता निशाणी ५६/६ कडील दस्त नं.९२/२०११ च्या दस्ताची सही शिक्क्याची नक्कल दाखविली. सदरचा दस्त प्रतिवादींच्या दरम्यान झालेल्या विक्री पत्राची सही शिक्क्याची नक्कल आहे. सदरचा दस्त प्रतिवादी क्र. ७ ने कैफियतीच्या कलम ८ मध्ये कबूल केला असल्याने त्यास **<u>निशाणी ६४</u>** देण्यात येते.

१६. मला आता निशाणी ५६/७ व ८ कडील माझी बहीण सुलोचना हिने आमचे वकील व्यास यांचे मार्फत प्रतिवादी इंदूबाई उर्फ इंदिरा व संदीप तसेच ग्रामपंचायत खंडाळा यांना पाठविलेल्या नोटीसीच्या स्थळ प्रती दाखविल्या. त्यावर माझी बहीण सुलोचना व वकील व्यास यांच्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्या सहया मी ओळखते, त्यांना **<u>निशाणी ६५ व ६६</u>** देण्यात येते.

१७. मला आता निशाणी ५६/९ कडील पोस्टाच्या पावत्या दाखविण्यात आल्या. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास एकत्रात **<u>निशाणी ६७</u>** येते.

१८. मला आता निशाणी ५६/१० कडील उत्तरी नोटीस दाखविली. सदरची नोटीस प्रतिवादी संदीप तर्फे आमचे वकील श्री. व्यास यांना पाठविण्यात आलेली नोटीस आहे. त्यास **निशाणी ६८** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास प्रतिवादी व त्यांच्या वकीलांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर, करीता उलटतपास नाही.**

**फेरतपासणी नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT

Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2025.08.21 11:02:28 +0530

कामठी
दिनांक २०/०८/२०२५

( एम.आर. कामत )
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कामठी